Ease of Doing Business

अनुज्ञप्ती नमुना PLL, CL१,BRL व I

यांचे नुतनीकरण

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासन परिपत्रक क्र. बीपीए०८१९/प्र.क्र.१४६ (भाग-१)/राउशु-२,

दिनांक :-१८.०९.२०१९

वाचा:- शासन निर्णय क्र. एसटीसी-१००५/सीआर-३६/टॅक्स-३, दि. ०३ सप्टेंबर, २००५.

## परिपत्रक

राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्य शासनाचा राजस्व विभाग आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायदा,१९४९ मधील तरतुदीनुसार मद्य, मद्यार्क उत्पादन व विक्री तसेच यासाठी लागणारे कच्चे पदार्थ यांच्याशी संबंधित विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार या विभागास आहेत. सदर क्षेत्रामधुन राज्य शासनास महसुल प्राप्त होतो. या क्षेत्रातील उद्योगास वेगवेगळया परवानग्या मिळण्यास विलंब होत असल्याच्या सुचना/निवेदन प्राप्त होत आहेत. अशा अडचणींमुळे उद्योगाच्या कार्यप्रणालीवर पर्यायाने शासनाच्या महसुलावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे. गतीमान प्रशासन व उद्योगधंद्यांना Ease of Doing Business या धोरणांतर्गत कालबाहय नियम व प्रचलित पध्दतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे जाणवते.

त्याअनुषंगाने शासनाने स्थापन केलेल्या कार्यगटाच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या असुन पुढील प्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत. अनुज्ञप्ती नुतनीकरण प्रलंबित राहण्याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

अ) विक्रीकर विभागाचे ना देय प्रमाणपत्र अप्राप्त.

आ) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे विधीग्राहय Consent to Operate अप्राप्त.

इ) संबंधित प्राधिकरणाचे अग्निशमन व्यवस्था असल्याबाबत प्रमाणपत्र अप्राप्त.

मद्य / मद्यार्क निर्मितीच्या अनुज्ञप्त्या या महाराष्ट्र मद्यार्क आसवनी व पेय मद्य निर्मिती नियम १९६६, महाराष्ट्र बियर व वाईन निर्मिती नियम १९६६ व महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ च्या तरतुदी नुसार देण्यात येतात. सदर नियमाच्या तरतुदीमध्ये नुतनीकरणासाठी केवळ नुतनीकरण अर्ज, नुतनीकरण अर्ज शुल्क व नुतनीकरण शुल्क एवढ्या बाबी नुतनीकरणासाठी विचारात घेण्याची तरतूद आहे. प्रशासकीय कारणास्तव इतर उपरोक्त नमुद बाबी विचारात घेतल्यामुळे नुतनीकरणास

दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत पुढीलप्रमाणे सुचना नेमलेल्या कार्यगटाच्या शिफारशीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

१) शासन निर्णयानुसार विक्री कराच्या Defaulter यादीत नाव असल्यास व दि.३१ मार्च पर्यंत ना देय प्रमाणपत्र सादर न केल्यास नुतनीकरण रोखता येईल.

२) अग्निशमन व्यवस्था, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाशी निगडीत प्रमाणपत्र ही सर्व प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित घटकाकडून साध्या कागदावर स्वयंघोषणापत्राद्वारे घेण्यात यावी.

३) उपरोक्त प्रमाणे दिलेले स्वयंघोषणापत्र खोटे ठरविल्यास संबंधित प्राधिकरणास त्याबाबत कळविण्यात येईल.

४) उत्पादन शुल्क विभागाची कोणतीही थकबाकी निघाल्यास संबंधित घटकावर महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ५४ (१) (अ) नुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

आयुक्तांनी संबंधित अधीक्षकांना यथोचित प्रस्ताव दि. ०५ एप्रिल पर्यंत आयुक्त कार्यालयास सादर होतील याबाबत सुचना द्याव्यात. आयुक्तांकडे प्रस्ताव दाखल झाल्यापासून उपरोक्त सुचना विचारात घेऊन सदर अनुज्ञप्तींचे आयुक्तांनी तात्काळ शक्यतो संगणीकृतरित्या पुढील १५ दिवसात नुतनीकरण करुन द्यावे.

(पु. हि. वागदे)
सह-सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४) निवडनस्ती, राज्य उत्पादन शुल्क-२, गृहविभाग

Point no-2